
स्थानिक गुन्हे शाखा

9:31 69%
Shanipeth PS P...

OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511
Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in

**प्रेस नोट :-** दिनांक -१०/०९/२०२५

---

प्रति,

संपादक,
दैनिक---------------

विषय :- स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी बकरी चोरी करणारे ०३ आरोपी यांना जेरबंद करुन मुद्देमाल हस्तगत केले बाबत.

----ooo-----

फिर्यादी नामे सैय्यद परवेज सैय्यद आसिफ वय २६ वर्ष रा. दत्त मंदीर जवळ शनिपेठ यांनी दि.०९/०९/२०२५ रोजी शनिपेठ पो.स्टे. येथे फिर्याद दिली की, दि.२७/०८/२०२५ रोजी त्यांचा ७०००/- रु किंमतीचा एक बोकड तसेच आवेश शेख यांची ६०००/- रु किंमतीची एक बकरी अशा कोणीतरी अज्ञात आरोपी याने चोरुन नेल्याबाबत फिर्याद दिल्याने शनिपेठ पो.स्टे. येथे सीसीटीएनएस गुरनं. २१६/२०२५ भा. न्या. संहिता कलम ३०३(२) प्रमाणे दि. ०९/०९/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

आज दि. १०/०९/२०२५ रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक, शरद बागल व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी सदर गुन्हयातील आरोपी नामे १)गणेश वासुदेव जाधव वय २० वर्ष २) गणेश अशोक पाटील वय २१ वर्ष ३) अक्षय विजय वंजारी वय २३ वर्ष सर्व रा. चिंचोली ता.जि. जळगांव यांना निष्पन्न करण्यात आले असुन त्यांना ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हयातील बकरी व बोकड चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांनी एमआयडीसी पो.स्टे. हद्दीतुन सुध्दा ०३ बकऱ्या चोरी केल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्हयात चोरलेला बोकड व बकरी खाटीक राहुल रतन राऊळकर यांना विक्री केल्याबाबत सांगितल्याने गुन्हयात चोरीस गेलेली बकरी खाटीक याचेजवळुन जप्त करण्यात आली असुन बोकडाची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. तसेच गुन्हा करण्याकरीता वापरलेल्या ०२ मोटरसायकली जप्त करण्यात आल्या असुन असुन नमुद आरोपी यांना पुढील तपासकामी शनिपेठ पो.स्टे. यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास शनिपेठ पो.स्टे. करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक सो., जळगांव, डॉ महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री अशोक नखाते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. शरद बागल, सफौ/अतुल वंजारी, पोहेकॉ/प्रविण भालेराव, पोहेकॉ/मुरलीधर धनगर, पोहेकॉ/विजय पाटील, पोहेकॉ/अक्रम शेख, पोहेकॉ/नितीन बाविस्कर, पोना/किशोर पाटील, पोकॉ/रतनहरी गिते, पोकॉ/सिध्देश्वर डापकर, पोकॉ/प्रदीप चवरे, पोकॉ/रविंद्र कापडणे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
जळगांव जिल्हा पोलीस